# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

१ला माळा, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स नागपूर-४४०००१

Email Id- recruitmentnagpurmunicipalcorp@gmail.com Website- https://nmcnagpur.gov.in


आस्थापना क्र 176 दिनांक : 29/05/२०२६

## सूचनापत्र

संदर्भ- जाहिरात क्र.३९९/पी.आर दि.२२.०८.२०२५

भरती प्रक्रिये संदर्भात विविध उमेदवारांकडून प्राप्त झालेली निवेदने, आक्षेप व विनंत्या या कार्यालयास प्राप्त झालेल्या असून त्यांची योग्य ती नोंद घेण्यात आलेली आहे.

उमेदवारांनी मांडलेल्या मुद्द्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर बाबींची नागपूर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम, शासन निर्णय, जाहिरात अटी तसेच प्रचलित प्रशासकीय तरतुदी यांच्या अनुषंगाने सखोल पडताळणी करण्यात येत आहे. भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, समान संधी व न्याय्य पद्धतीचे पालन होणे आवश्यक असल्याने कोणत्याही पात्र उमेदवारावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

तसेच काही उमेदवारांनी अंतिम निवड यादी व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करणे तसेच नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत विनंती केलेली आहे. तथापि, सध्या महाराष्ट्र राज्यात आचारसंहिता लागू असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९

२१. **आचारसंहितेच्या कालावधीमध्ये नेमणुका/भरती करण्याच्या दृष्टीने जाहिराती देणे, मुलाखती व प्रत्यक्ष नियुक्त्या करणेबाबत. -**

आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शासन सेवेत तसेच निमसरकारी संस्था, शासकीय मंडळे/महामंडळे उपक्रम इ. संस्थामध्ये कायमस्वरूपी, तात्पुरती किंवा कंत्राटी पद्धतीने भरती करण्याच्या दृष्टीने जाहिरात देणे, मुलाखती घेणे इ. करण्यात येऊ नये.

(1) आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच शासकीय/निमशासकीय पदावर कायमस्वरूपी, तात्पुरती किंवा कंत्राटी पद्धतीने भरती करण्याच्या अनुषंगाने लेखी परीक्षेबाबत पत्रे पाठविले असल्यास त्यासाठी लेखी परिक्षा घेण्यास हरकत नाही. मात्र मुलाखती घेणे, निकाल जाहीर करणे व प्रत्यक्ष नेमणुका करणे इत्यादी बाबतची कार्यवाही आचारसंहिता कालावधीत करता येणार नाही.

(2) ज्या संस्थाच्या भरती प्रक्रियेचे वेळापत्रक निश्चित होऊन ते अगोदरच प्रसिद्ध केले असेल अशा प्रकरणी आचारसंहिता लागू होण्यापूर्वी जाहिरात देऊन :-

(i) लेखी परीक्षा, शारीरिक चाचणी ,मुलाखत व निकाल जाहीर केला असला तरी ही नियुक्ती पत्र देता येणार नाही.

(ii) लेखी परीक्षा, शारीरिक चाचणी, मुलाखत ही प्रक्रिया पूर्ण केली असली तरी निकाल जाहिर करता येणार नाही.

(iii) लेखी परीक्षा ,शारीरिक चाचणी, मुलाखत, निकाल ही प्रक्रिया पूर्ण होऊन नियुक्ती पत्र देखिल देण्यात आले असेल तर अशा प्रकरणी संबंधित उमेदवाराला हजर होण्याची मुभा देण्यास हरकत नाही.

(iv) ज्या संस्थानी भरतीसंबंधी वार्षिक कार्यक्रम तयार करून तो जाहीर केला असल्यास आचार संहितेच्या अंमल कालावधीमध्ये अशा संस्थाना त्यांच्या वार्षिक कार्यक्रमानुसार जाहिरात, लेखी परिक्षा, शारीरिक चाचणी, मुलाखती इत्यादी टप्पे पार पाडता येतील. मात्र निकाल जाहीर करता येणार नाही अथवा नियुक्तीपत्र देता येणार नाही. असे नमूद असून सद्य:स्थितीत पदभरती प्रक्रिया करता येणार नाही.

तसेच आचारसंहितेच्या कालावधीत भरती प्रक्रियेतील पुढील कार्यवाही करण्यास निर्बंध आहेत.वरील शासन निर्देश व कायदेशीर तरतुदींच्या अधीन राहूनच पुढील कार्यवाही करण्यात येईल. आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील प्रक्रिया राबविण्यात येईल याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सहा.आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
महानगरपालिका नागपूर

भारत निर्वाचन आयोग
**Election Commission of India**

निर्वाचन सदन
NIRVACHAN SADAN
अशोक रोड, नई दिल्ली-110001
ASHOKA ROAD, NEW DELHI-110001

**No. ECI/PN/088/2026** **Dated: 18th May, 2026**

**PRESS NOTE**

**Sub: Bye-election to the Maharashtra Legislative Council from Nagpur Local Authorities' Constituency- reg.**

There is a casual vacancy in the Maharashtra Legislative Council from Nagpur Local Authorities' Constituency. The details of the vacancy are under: -

| Name of Member | Cause of vacancy | Date of Vacancy | Date of Retirement |
|---|---|---|---|
| Bawankule, Chandrashekhar Krishnaraoji | Seat vacated consequent upon election to the Maharashtra Legislative Assembly. | 23.11.2024 | 01.01.2028 |

2. As per the guideline laid down by the Commission, at least 75% local bodies in a Local Authorities' Constituency should be functioning and at least 75% electors therein should be in position, for an election to be conducted from that Constituency.

3. Bye-election to fill up the above-mentioned casual vacancy could not be conducted at the time due to non-fulfillment of the aforesaid criteria.

4. Now, CEO Maharashtra has informed that these criteria have been fulfilled in respect of the said Constituency.

5. Therefore, the Commission has decided to conduct bye-election to the Maharashtra Legislative Council from Nagpur Local Authorities' Constituency in accordance with the following programme:-

| Events | | Days & dates |
|---|---|---|
| 1. | Issue of Notification | 25th May, 2026 (Monday) |
| 2. | Last date of making nominations | 01st June, 2026 (Monday) |
| 3. | Scrutiny of nominations | 02nd June, 2026 (Tuesday) |
| 4. | Last date for withdrawal of candidatures | 04th June, 2026 (Thursday) |
| 5. | **Date of poll** | **18th June, 2026 (Thursday)** |
| 6. | Hours of poll | 08:00 am- 04:00 pm |
| 7. | Counting of Votes | 22nd June, 2026 (Monday) |
| 8. | Date before which election shall be completed | 25th June, 2026 (Thursday) |

6. The Model Code of Conduct concerning the said election will come into force with immediate effect in the concerned Constituency. Please see the details in Commission's website under the link: https://old.eci.gov.in/files/file/4070-biennial-bye-elections-to-the-legislative-councils-from-council-constituencies-by-graduates%E2%80%99-and-teachers%E2%80%99-and-local-authorities%E2%80%99-constituencies-%E2%80%93-mcc-instructions-%E2%80%93-regarding/

**(RAJESH KUMAR SINGH)**
**UNDER SECRETARY**